२. संतवाणी-(अ) जैसा वृक्ष नेणे

संत नामदेव (१२७०-१३५०) : वारकरी संप्रदायातील संतकवी. संत नामदेवांची अभंगरचना अतिशय उत्कट असून त्यांच्या अभंगाची भाषा सुबोध, सरळ, साधी आहे. संत नामदेवांनी हिंदीतही रचना केली आहे. पंजाबात जाऊन त्यांनी भागवत धर्माची पताका फडकवली. शिखांच्या 'गुरु ग्रंथसाहेब' या ग्रंथात त्यांची एकसष्ट कवने समाविष्ट असून 'भक्त नामदेवजी की मुखबानी' या नावाने ती प्रसिद्ध आहे. संत नामदेवांची अभंगगाथा पुस्तकरूपाने १८९२ मध्ये प्रथम लोकांसमोर आली.

प्रस्तुत अभंगामध्ये संतांना वृक्षाची उपमा देऊन त्यांची महती सांगितली आहे.

जैसा वृक्ष नेणे मान अपमान ।
तैसे ते सज्जन वर्तताती ।।१।।

येऊनियां पूजा प्राणि जे करिती ।
त्याचें सुख चित्तीं तया नाही ।।२।।

अथवा कोणी प्राणी येऊनि तोडिती।
तया न म्हणती छेदूं नका ।।३।।

निंदास्तुति सम मानिती जे संत ।
पूर्ण धैर्यवंत साधु ऐसे ।।४।।

नामा म्हणे त्यांची जरी होय भेटी ।
तरी जीव शिवा गांठी पडूनि जाय ।।५।।

[सकलसंतगाथा खंड पहिला : संत नामदेव महाराजांची अभंगगाथा
अभंग क्र.१४७७]
संपादक-प्रा. डॉ. र. रा. गोसावी.

स्वाध्याय

प्र. १. वृक्ष आणि संत यांच्यातील साम्य लिहून तक्ता पूर्ण करा.

वृक्ष	संत

प्र. २. खालील तक्ता पूर्ण करा.

वृक्ष	घटना	परिणाम
	वंदन केले.	
	घाव घातले.	

प्र. ३. खालील विधानांपैकी सत्य विधान ओळखून लिहा.

(अ) संतांचे वर्तन वृक्षाप्रमाणे असते.

(आ) संतांना सन्मानाची अपेक्षा असते.

(इ) संत निंदास्तुती समान मानत नाहीत.

(ई) संत सुख आणि दु:ख समान मानत नाहीत.

प्र. ४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

(१) वृक्ष (२) सुख (३) सम

प्र. ५. काव्यसौंदर्य.

(अ) ‘अथवा कोणी प्राणी येऊनि तोडिती । तया न म्हणती छेदूं नका ।।’ या काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ सांगा.

(आ) ‘निंदास्तुति सम मानिती जे संत । पूर्ण धैर्यवंत साधु ऐसे ।।’ या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

प्र. ६. अभिव्यक्ती.

(अ) प्रस्तुत अभंगातून संतांना दिलेल्या वृक्षाच्या उपमेसंदर्भातील तुमचे मत स्पष्ट करा.

(आ) तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एखाद्या अभंगाविषयीची माहिती लिहा.

उपक्रम : ‘वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे....’ हा अभंग वर्गात वाचून त्यावर चर्चा करा.

भाषा सौंदर्य

खाली दिलेल्या कंसातील शब्दांना (क्रियापदांना) ‘ईव’ प्रत्यय जोडून विशेषणे तयार करा व त्यांच्यासाठी समर्पक विशेष्य शोधून लिहा.

उदा., आखणे – आखीव – आखीव कागद.

(रेखणे, कोरणे, ऐकणे, घोटणे, राखणे) यांसारख्या इतर शब्दांचा शोध घ्या.

भाषाभ्यास

आपण जेव्हा कथा, कादंबरी, कविता, नाटक वगैरे साहित्य वाचतो, तेव्हा दैनंदिन जगण्यातील भाषेपेक्षा थोडी वेगळी भाषा आपल्याला वाचायला मिळते. आपल्याला साहित्य वाचनाचा आनंद मिळवून देण्यात या भाषेचा मोठा वाटा असतो. दैनंदिन व्यवहारातील भाषेपेक्षा साहित्याची भाषा ज्या घटकांमुळे वेगळी ठरते, त्यातील एक घटक म्हणजे अलंकार.

अलंकाराचे शब्दालंकार आणि अर्थालंकार हे दोन प्रकार आपल्याला माहीत आहेत. अर्थालंकारांमध्ये ज्या वस्तूला उपमा दिलेली असते तिला उपमेय म्हणतात आणि ज्या वस्तूची उपमा दिलेली असते तिला उपमान म्हणतात. आता उपमेय आणि उपमानातील साधर्म्यावर आधारित काही अलंकारांचा आपण परिचय करून घेऊया.

(१) रूपक अलंकार :

- **खालील उदाहरण वाचा व समजून घ्या.**

उदा., नयनकमल हे उघडित हलके जागी हो जानकी ।

(१) वरील उदाहरणातील उपमेय– [ ]

(२) वरील उदाहरणातील उपमान– [ ]

- **रूपक अलंकाराची वैशिष्ट्ये–** (१) उपमेय व उपमान यांच्यात साम्य.
  (२) उपमेय हे उपमानच आहे असे मानणे.
  (३) अनेकदा केवळ, प्रत्यक्ष, साक्षात, मूर्तिमंत इ. साधर्म्य दर्शक शब्दांचा वापर.

उपमेय व उपमान (कमल व नयन) यांच्यातील साम्यामुळे दोन्ही गोष्टी एकच वाटतात म्हणून इथे 'रूपक' अलंकार होतो. यात नयन हे कमळासारखे आहेत (उपमा) किंवा नयन म्हणजे जणू काही कमलच आहे (उत्प्रेक्षा) असे न म्हणता नयन हेच कमल असे दर्शवले आहे, म्हणून येथे रूपक अलंकार झाला आहे.

- **जेव्हा वाक्यांत उपमेय, उपमान यांच्यातील साम्यामुळे दोन्ही गोष्टी अभिन्न दर्शवल्या जातात तेव्हा 'रूपक' अलंकार होतो.**

- **खालील ओळी वाचा.**

ऊठ पुरुषोत्तमा । वाट पाहे रमा ।
दावि मुखचंद्रमा । सकळिकांसी ।।

उपमेय [ ]

उपमान [ ]

२. संतवाणी–(आ) धरिला पंढरीचा चोर

संत जनाबाई : वारकरी संप्रदायातील संत कवयित्री. संत नामदेवांच्या शिष्या. त्यांना संत नामदेवांच्या सान्निध्यात विठ्ठलभक्तीचा ध्यास लागला. संत जनाबाईंनी विपुल काव्यरचना केली आहे. विशुद्ध वात्सल्य, आत्मसमर्पणाची भावना त्यांच्या अभंगवाणीत ओतप्रोत भरलेली आहे.

प्रस्तुत अभंगात संत जनाबाईंनी भक्तीच्या माध्यमातून विठ्ठलाला कसे प्राप्त केले, याबाबतचे वर्णन केले आहे.

धरिला पंढरीचा चोर ।
गळां बांधोनियां दोर ।।१।।

हृदय बंदिखाना केला ।
आंत विठ्ठल कोंडिला ।।२।।

शब्दें केली जवाजुडी ।
विठ्ठल पायीं घातली बेडी ।।३।।

सोहं शब्दाचा मारा केला ।
विठ्ठल काकुलती आला ।।४।।

जनी म्हणे बा विठ्ठला ।
जीवें न सोडीं मी तुला ।।५।।

[सकलसंतगाथा खंड पहिला : संत जनाबाईंचे अभंग
अभंग क्र.१८०]
संपादक–प्रा. डॉ. र. रा. गोसावी.

स्वाध्याय

प्र. १. खाली दिलेल्या शब्दांसाठी अभंगात आलेल्या उपमा लिहा.

(अ) विठ्ठल →

(आ) हृदय →

प्र. २. जोड्या लावा.

'अ' गट	'ब' गट
(१) विठ्ठलाला धरले	(अ) शब्दरचनेच्या जुळणीने
(२) विठ्ठल काकुलती आला	(आ) भक्तीच्या दोराने
(३) विठ्ठलाच्या पायी घातली बेडी	(इ) 'तू म्हणजे मीच' या शब्दाने

प्र. ३. काव्यसौंदर्य.

(अ) 'सोहं शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुलती आला ।।' या ओळीतील विचार स्पष्ट करा.

(आ) 'जनी म्हणे बा विठ्ठला । जीवें न सोडीं मी तुला ।।' या ओळीतून व्यक्त झालेला संत जनाबाईंचा भाव स्पष्ट करा.

(इ) प्रस्तुत अभंगातून संत जनाबाईंच्या मनातील विठ्ठलाविषयीच्या कोणत्या भावभावना दिसून येतात, ते सांगा.

प्र. ४. अभिव्यक्ती.

(अ) मानवी जीवनातील निष्ठा, भक्ती आणि प्रयत्न यांचे असलेले महत्त्व तुमच्या शब्दांत सांगा.

उपक्रम : आंतरजालाच्या साहाय्याने महाराष्ट्रातील संत कवयित्रींची माहिती मिळवा.